# ग्रामपंचायत कार्यालय, कोकणेर

(स्थापना : दि. १३.१०.१९८९)

मु. कोकणेर, पो. मासवण, ता. व जि. पालघर.

जावक क्र. : 2/2023/28

दिनांक : 9/4/2023

प्रति,

मा. डॉ.प्रशांत शेलार
प्राचार्य
जे.ई.एस महाविद्यालय,
जोगेश्वरी (पू) मुंबई–६०

विषय:– राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उत्तम आयोजन केल्याबद्दल आभार पत्र.

मा. महोदय,

आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजने (NSS Unit) अंतर्गत दिनांक २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२२ हया सात दिवसांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. आपण प्राचार्य असूनही स्वत:शिबिरात उपस्थित राहून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना सामाजिक कार्याची ओळख करून दिलीत. आपल्या हया सात दिवसांच्या उपक्रमात गाव स्वच्छता अभियान, नेत्र तपासणी शिबिर, पथनाटयातून जनजागृती करण्यात आली, स्वसंरक्षण शिबिर, चित्रकला, गायन स्पर्धा तसेच विविध सांस्कृतिक (भजन, आरती इ.) कार्यक्रमाचे आयोजन, शाळकरी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी रंगपेटी देऊन चित्रकला स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त केलेत, गावातील विद्यार्थ्यांना बिस्कीट वाटप तर गरीब गरजू शंभर गावकऱ्यांना ब्लॅकेट वाटप करण्यात आले. गावातील मंदिराचे सुशोभिकरण केले, गावकऱ्यांनी पॅन कार्ड, आधार कार्ड, बँक खाते हया विषयावर जनजागृती केलीत.

हया सात दिवसात आमच्या कोकणेर, जिल्हा पालघर हया छोटयाशा गावात शिबिराच्या निमित्ताने प्रथमच पालघर जिल्हयाचे जिल्हयाधिकारी/जिल्हादंडाधिकारी श्री. गोविंद मारूती बोडके यांचे आगमन झाले. आम्हा गावकऱ्यांना त्यांचे स्वागत करण्याची संधी आपणामुळे प्राप्त झाली. श्री. गोविंद बोडके यांच्या प्रत्यक्ष भेटीमुळे गावातील अडचणी, समस्या एक सरपंच हया नात्याने मला त्यांच्यापर्यंत पोहचविता आल्या.

आपली सामाजिक कार्याची ओढ व तळमळ पाहता महाविद्यालयातील मा. डॉ. प्रशांत शेलार, उपस्थित प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवक विद्यार्थी हया सर्वांचे मी सरपंच हया नात्याने आभार व्यक्त करते. आमच्या हया लहान गावाची राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराकरीता निवड केलीत आम्ही धन्य झालो. तसेच भविष्यातही सहकार्याची अपेक्षा.

–धन्यवाद–

आपली विश्वासू

सरपंच
ग्रामपंचायत कोकणेर